-:प्रेसनोट:- दिनांक:- १६/११/२०१७

## चुलत भावाचा खुन करणारा २४ तासात जेरबंद.

वाकड पोलीस ठाणे येथे गु.र.नं-६४७/२०१७ भा.द.वि कलम ३०२ मधील मयम इसम नामे सतीश गुलाब सोनवणे वय-४० वर्षे रा.ताथवडे गाव,सोनवणे वस्ती ता.मुळशी जि.पुणे याचा कोणीतरी अज्ञात इसमाने धारधार शत्राने खुन केलेला होता.

आज रोजी आम्ही स्वतः, पोलीस हवालदार २४९१ क्षीरसागर, पोहवा १७३२ गभाले,पोहवा २४९५ शेख, पोना २५५३ गुरव, पोशि ७७३४ शेडगे, पोशि १२००३ भोकरे असे स्वारगेट एस.स्टी स्टँड येथे पेट्रोलिंग करीत असताना पोलीस हवालदार २४९१ क्षीरसागर यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम संशयास्पदरित्या सणस ग्राऊंडच्या बाजुला फिरत आहे. त्याच्या अंगात काळा टिर्शट पांढऱ्या रंगाची जॉगिंग पँट असे असुन त्याचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे आहे अशी बातमी मिळाली ती आम्ही वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना फोनव्दारे कळविली. आम्ही सदर ठिकाणी शोध घेतला असता, वरील वर्णनाचा इसम सणस ग्राऊंडच्या बाजुला, सणस पुतळ्याकडे जाणारे रोडच्या कडेला मिळुन आला. त्यास त्याचे नाव व पत्ता विचारता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागल्याने त्याच्या वर्तनावरुन त्याने एखादा गुन्हा केला असावा असा संशय आल्याने त्याला पोलीस स्टेशन येथे आणुन विश्वासात घेऊन विचारपुस करता त्याने आपले नाव दिपक श्रीरंग सोनवणे वय-३० वर्षे रा.ताथवडे गाव सोनवणे वस्ती ता.मुळशी जि.पुणे असे सांगुन आपण दि.१५/११/२०१६ रोजी सायंकाळी ०६.००वा ते ०७.०० वा दरम्यान पुर्वी असलेल्या भांडणाच्या रागातुन चुलत चुलत भाउु नामे सतीश गुलाब सोनवणे रा.सदर याचा खुन केला असुन स्वारगेट येथुन बस मध्ये बसुन पळुन जाण्या करीता आलो आहे असे सांगितले. तसेच त्याने त्याचेवर वडगाव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे खुनाचा व हिंजवडी पोलीस स्टेशन येथे खंडणीचा गुन्हा दाखल असल्याचे सांगितले. घडले घटनेबाबत वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ६४७/२०१७ भा.द.वि कलम ३०२ असा दाखल असल्याचे माहिती मिळाल्याने त्यास वाकड पोलीस ठाणे, पुणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

**सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री प्रविण मुंढे, स्वारगेट विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री फारुक काझी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री मच्छिंद्र पंडित, तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक समाधान कदम, पोलीस हवालदार २४९१ क्षीरसागर, पोलीस हवालदार गभाले, पोलीस हवालदार शेख, पो.ना २५५३ गुरव, पो.शि.७७३४ शेडगे, पो.शि.१२००३ भोकरे, पो.शि. ८१२४ मोरे यांनी केलेली आहे.**